| MHRG080000732026 | **दिवाणी चौकशी अर्ज क्र. ७/२०२६**<br>श्रीमती. पदमाबाई सांडू चिकटे व इतर ३<br>**विरुध्द**<br>कोणीही नाही. |
|---|---|

## <u>निशाणी क्र. १ खालील आदेश</u>

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज ते मयत सांडू भिका चिकटे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून तसा वारस दाखल अर्जदार यांचे नावाने मिळावा याकरिता बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जातील हकीकत थोडक्यात अशी आहे की, अर्जदार क्र.१ पदमाबाई सांडू चिकटे याचे पती व अर्जदार क्र.२ श्री. आनंद सांडू चिकटे, अर्जदार क्र.३ कुमारी पूजा सांडू चिकटे, अर्जदार क्र.४ कुमारी सोनल सांडू चिकटे सर्व रा. काजूवाडी, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड यांचे वडील कै. सांडू भिका चिकटे हे दिनांक ०९/०४/२०२१ रोजी सिव्हील हॉस्पीटल औरंगाबाद येथे मयत झाले आहेत. मयत सांडू भिका चिकटे यांना अर्जदार यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार हे मयत सांडू भिका चिकटे यांचे कायदेशीर वारस आहेत असे नाममात्र घोषित होवून तसा वारस दाखला अर्जदार यांना देण्यात यावा यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदार यांनी निशाणी क्र.४ सोबत पुराव्याकामी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यामध्ये मयत सांडू भिका चिकटे यांच्या मृत्यु दाखल्याची छायांकित प्रत तसेच मयत व अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या आधारकार्डच्या प्रमाणित प्रती ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदार क्र.१ ने पुराव्याचे कामी स्वतःचे नावे निशाणी क्र.११ वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यात अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार केला आहे. तसेच निशाणी क्र.१२ वरील वर्णनयादीसोबत दैनिक सागर रायगड या वृत्तपत्रात दिनांक २९/०१/२०२६ रोजी नोटीस प्रकाशीत केलेबाबत वर्तमानपत्राची प्रत अभिलेखावर दाखल आहे. अर्जदाराने निशाणी क्र.१३ अन्वये पुरावा बंद पुरसीस दाखल करून त्यांचा पुरावा बंद केला आहे.

४. मी अर्जदारांच्या तोंडी पुराव्याचे व उपरोक्त कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले. त्यावरून असे दिसून येते की, दिनांक २९/०१/२०२६ रोजी अर्जदाराने विधिज्ञामार्फत दैनिक सागर रायगड या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे. निशाणी क्र.७ वरील बेलीफ अहवालानुसार घोषणापत्राची एक प्रत मयताच्या घरी अर्जदार क्र.१ यांच्या व पंचांच्या समक्ष मयताच्या राहते घरात वावरते घराचे दर्शनीय दारास डकवून प्रसिध्द केलेली आहे. तसेच नगर परिषद खोपोली यांच्या नोटीस बोर्डवर डकवून प्रसिध्द केली आहे. तसेच जाहीरनाम्याची एक प्रत मौजे खोपोली येथे सार्वजनिक ठिकाणी डकवून प्रसिद्ध केलेली आहे. तसेच ती जमलेल्या लोकांना वाचून दाखवून त्याची दवंडी देण्यात आलेली आहे. तसेच एक प्रत दिवाणी न्यायालय खालापूर यांच्या नोटिस बोर्डवर डकवून प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सर्व कायार्लयाचे माहितगार इसम यांनी त्याची अंमलबजावणी केलेली आहे. मात्र आजतागायत सदर नोटीस संबंधाने कोणीही अर्जास हरकत घेतलेली नाही.

५. अर्जदाराने दाखल केलेल्या निशाणी क्र.४ वरील कागदयादी सोबत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत सांडू भिका चिकटे हे दिनांक ०९/०४/२०२१ रोजी सिव्हील हॉस्पीटल औरंगाबाद येथे मयत झाले आहेत. अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत सांडू भिका चिकटे हे अर्जदार क्र.१ याचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ याचे वडील होते. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त त्यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. सदरच्या कथनाच्या पृष्टयर्थ अर्जदार क्र.१ याने त्यांचे स्वतःचे शपथपत्र निशाणी क्र.११ वर दाखल केले आहे व त्यामध्ये अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार केला आहे.

६. अर्जदार यांनी ते मयत सांडू भिका चिकटे यांचे वारस असल्याबाबत शपथेवर कथन केले आहे. अर्जदार यांनी जाहीर नोटीस प्रकाशित करून देखील कोणीही वारस दाखला देण्यासंबंधाने आक्षेप नोंदविलेला नाही. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी शपथेवर असे कथन केले आहे की, मयत सांडू भिका चिकटे यांचे ते कायदेशीर वारस आहेत. सदर कथनास देखील आजतागायत कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदारांच्या कथनांवर अविश्वास ठेवण्यासारखे काही कारण नाही. त्यामुळे अर्जदार हे मयत सांडू भिका चिकटे यांचे वारस असल्याने अर्जदार यांच्या नावे वारस दाखला देण्यास कोणताही अडसर नाही. याकरिता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

# आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. याव्दारे असे आदेशित करण्यात येते की, अर्जदार क्र.१ श्रीमती. पदमाबाई सांडू चिकटे, अर्जदार क्र.२ श्री. आनंद सांडू चिकटे, अर्जदार क्र.३ कुमारी पूजा सांडू चिकटे व अर्जदार क्र.४ कुमारी. सोनल सांडू चिकटे हे मयत सांडू भिका चिकटे यांचे कायदेशीर वारस असुन त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. सदरचे प्रमाणपत्र हे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) असून उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) नाही व ते फक्त अर्जदार यांना शासकिय व निमशासकीय कामासाठी देण्यात येते आहे.

४. मे. नाझर यांनी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली कोर्ट फि चा तपशिल द्यावा.

५. सदर प्रमाणपत्र हे दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिष्छेद ३१२ मधील टिपणीस अधिन राहून देण्यात येत आहे. अर्जदार यांनी प्रमाणपत्र प्राप्तीपासून वरील टिपणीस अनुसरून पुढील पुर्तता करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.03.09 17:37:48 +0530

(डी. एस. खोत )

स्थळ – खालापूर
सह दिवाणी न्यायाधीश,

दिनांक – ०९/०३/२०२६
क.स्तर, खालापूर.